पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ५

**सभावृत्तांत**

दिनांक - ०५/११/२०१४ वेळ - दुपारी २.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०५/११/२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. ननवरे जितेंद्र बाबा - **सभापती**
२) मा. तानाजी विठ्ठल खाडे
३) मा. लोंढे शुभांगी संतोष
४) मा. साळुंके सविता सुरेश
५) मा. गिता सुशिल मंचरकर
६) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
७) मा. बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.माछरे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.बेंडे - प्रशासन अधिकारी, मा.पानसरे - क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र. २) मनपाच्यावतीने पुणे विभागीय शालेय क्रिकेट (१४ वर्षे मुले) स्पर्धा आयोजित करणेबाबत - मा.गिता मंचरकर, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३) भोसरी धावडेवस्ती येथील व्यायामशाळेला नविन व्यायाम साहित्य देणेबाबत - मा.निलेश बारणे, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ४) मासुळकर कॉलनी व्यायामशाळेत व्यायाम साहित्य मिळणेबाबत - मा.निलेश बारणे, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ५) व्यायामशाळा चालविणेस देणेबाबत - मा.निलेश बारणे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ६) चिंचवडगाव येथील व्यायामशाळा संस्कृती महिला बचत गट चिंचवडगाव यांना चालविणेस देणेबाबत - मा.निलेश बारणे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ७) महापौर चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धा २०१४-१५ आयोजित करणेबाबत - मा.आशा सुपे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक - १८ | विषय क्रमांक - १

दिनांक - ०५/११/२०१४ | विभाग - क्रीडा

सुचक - मा.तानाजी खाडे | अनुमोदक - मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/५३४/२०१४, दि.०७/१०/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ३२ वा वर्धापनदिन २०१४ अनुषंगाने विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करणेस व स्पर्धेतील विजेत्या / उपविजेत्या खेळाडूंना बक्षिस स्वरुपात द्यावयाचे स्वेट शर्ट, टी शर्ट, शॉर्ट, ट्रॉफीज, स्मृती चिन्हे, खरेदी, कॅप, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, क्रीडा साहित्य खरेदी, स्पर्धा प्रसंगी अधिकारी, पाहुणे, कर्मचारी यांना चहापान व अल्पोपहार, क्रीकेट स्पर्धेच्या दिवशी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना द्यावयाचे भोजन, इ.कामी येणा-या अंदाजे र.रु.२,३६,१६०/- (अक्षरी र.रु.दोन लाख छत्तीस हजार एकशे साठ फक्त) चे खर्चास मान्यता व स्पर्धेतील विजेत्या / उपविजेत्या खेळाडूंना बक्षिस स्वरुपात द्यावयाचे स्वेट शर्ट, टी शर्ट, शॉर्ट, ट्रॉफीज, स्मृती चिन्हे खरेदी, कॅप, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, क्रीडा साहित्य इ.ची खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस व खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - १९ | विषय क्रमांक - २

दिनांक - ०५/११/२०१४

सुचक - मा.गिता मंचरकर | अनुमोदक - मा.शुभांगी लोंढे

संदर्भ : मा.गिता मंचरकर, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव -

मनपाच्यावतीने पुणे विभागीय शालेय क्रिकेट (१४ वर्षे मुले) क्रीडा स्पर्धा कै.आण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर पिंपरी पुणे विनामुल्य उपलब्ध करुन देणेस व स्पर्धा अनुषंगाने एकूण ११५ खेळाडूंची निवास व्यवस्था प्रा.मोरे प्रेक्षागृह, चिंचवड व

कै.आण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर, पिंपरी पुणे येथील क्रीडा प्रबोधिनी वसतिगृह येथे करणेकामी प्रति दिन प्रति खेळाडू र.रु.१००/- प्रमाणे (गाद्या, उशा, चादर इ.कामी होणारा खर्च व प्रेक्षागृह भाडे इ.) ६ दिवसांकरिता येणा-या एकूण र.रु.६९,०००/- चे खर्चास मान्यता व सदर खर्च क्रीडा निधी, वार्षिक स्पर्धा क्रीडा कला या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २० विषय क्रमांक - ३

दिनांक - ०५/११/२०१४

सुचक - मा.निलेश बारणे अनुमोदक - मा.शुभांगी लोंढे

संदर्भ : मा.निलेश बारणे, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव -

भोसरी धावडेवस्ती येथील बांधलेल्या व्यायामशाळेस १) १२ स्टेशन मल्टी जीम, २) स्मीथ मशीन, ३) कॉटन ओव्हर पुली, ४) पेक डेक, ५) लेग प्रेस, ६) इन क्लाईन बेंच, ७) डीक्लाइन बेंच, ८) बेंच प्रेस बेंच, ९) बारवेल बार ६ फुटी, १०) बारवेल बार साडेपाच फुटी, ११) आरसे (८ x ४) ४ नग, १२) डंबेल्स ५ किग्रॅ. ४ नग, १३) डंबेल्स १० किग्रॅ. ४ नग, १४) डंबेल्स १५ किग्रॅ. ४ नग, १५) डंबेल्स २० किग्रॅ. ४ नग, १६) वेट प्लेट ५ किग्रॅ. ४ नग, १७) वेट प्लेट १० किग्रॅ. ४ नग, १८) वेट प्लेट १५ किग्रॅ. ४ नग, १९) वेट प्लेट २० किग्रॅ. ४ नग हे साहित्य देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २१ विषय क्रमांक - ४

दिनांक - ०५/११/२०१४

सुचक - मा.निलेश बारणे अनुमोदक - मा.शुभांगी लोंढे

संदर्भ : मा.निलेश बारणे, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव -

मासुळकर कॉलनी व्यायामशाळेस **१)** अब्स कन्च मशीन - १ नग, **२)** रिअर डेलटॉईल प्लाय मशीन - १ नग, **३)** सायकल - ३ नग, **४)** वॉटर - ३ नग, **५)** बारबेल बार ३ फुटी - १ बार, ६ फुटी - १ बार, ८ फुटी - १ बार, **६)** डंबेल्स १ किग्रॅ. ५ सेट, डंबेल्स १.५ किग्रॅ. २ सेट, डंबेल्स २.५ किग्रॅ. २ सेट, डंबेल्स ५.५ किग्रॅ. २ सेट, डंबेल्स १० किग्रॅ. २ सेट, डंबेल्स १५ किग्रॅ. १ सेट, डंबेल्स २० किग्रॅ. १ सेट, **७)** वेट प्लेट ५ किग्रॅ. ६ नग, वेट प्लेट १० किग्रॅ. ६ नग, वेट प्लेट १५ किग्रॅ. ४ नग, वेट प्लेट २० किग्रॅ. २ नग, वेट प्लेट २५ किग्रॅ. २ नग, वेट प्लेट ३० किग्रॅ. २ नग तसेच पूर्ण जीम मध्ये मॅट ९०० स्क्वेअर फुट हे साहित्य देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २२ विषय क्रमांक - ५

दिनांक - ०५/११/२०१४

सुचक - मा.निलेश बारणे अनुमोदक - मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ : मा.निलेश बारणे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव -

भोसरी सहलकेंद्र येथे असणारी व्यायामशाळा अनेक दिवसांपासून बंद आहे. सदर व्यायामशाळा ही " मैत्री समाज विकास संस्था " भोसरी यांना चालविण्यास देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २३ विषय क्रमांक - ६

दिनांक - ०५/११/२०१४

सुचक - मा.निलेश बारणे अनुमोदक - मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ : मा.निलेश बारणे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची चिंचवडगाव येथील व्यायामशाळेचे दुरुस्तीचे व नुतनीकरणाचे काम सध्या पूर्ण झाले असून सदर ठिकाणी महिला व्यायामशाळेची मागणी असून सदर व्यायामशाळा संस्कृती महिला बचत गट यांचा चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २४ विषय क्रमांक - ७

दिनांक - ०५/११/२०१४

सुचक - मा.आशा सुपे अनुमोदक - मा.सविता साळुंके

संदर्भ : मा.आशा सुपे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने महाराष्ट्र राज्य कबड्डी असो., पुणे जिल्हा कबड्डी असो. यांचे मान्यतेने माहे जानेवारी / फेब्रुवारी २०१४ मध्ये पी.डब्लू.डी.ग्राऊंड, सांगवी पुणे येथे महापौर चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धा २०१४-१५ आयोजित करण्याचे नियोजन आहे. तरी माहे जानेवारी / फेब्रुवारी २०१५ मध्ये पी.डब्लू.डी.ग्राऊंड, सांगवी पुणे येथे महापौर चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धा २०१४-१५ आयोजित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **ननवरे जितेंद्र बाबा** )
**सभापती**
क्रीडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८८२/२०१४
दिनांक : २०/११/२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Krida-14-15\proceeding1_Krida 5.doc